# * प्रकरण तिसरे *

## अरूणा ढेरे यांच्या
## ‘मनातलं आभाळ’ व
## ‘आठवणींतले आंगण’
## या ललितलेखसंग्रहांतील
## चित्रण विविधता.

# * प्रकरण तिसरे *

# अरुणा ढेरे यांच्या 'मनातलं आभाळ ' व'आठवणींतले आंगण' या लेखसंग्रहांतील चित्रण विविधता.

१. **प्रास्ताविक**

  १.१ 'मनातलं आभाळ'

  १.२ 'आठवणींतले आंगण'

२. **लेखसंग्रहांतील चित्रण विविधता.**

  २.१ बालविश्वाचे चित्रण.

  २.२ श्रद्धा, संस्कृती परंपरा यांचे चित्रण.

  २.३ लोकसाहित्याचा अनमोल ठेवा जतन करणारे चित्रण.

  २.४ निसर्ग चित्रण.

  २.५ धार्मिकता दर्शविणारे चित्रण.

  २.६ निसर्गाकडून दैववादाकडे झुकलेले चित्रण.

  २.७ काल आणि आज फरक दर्शविणारे चित्रण.

  २.८ शाश्वत आणि अशाश्वत दर्शन घडविणारे चित्रण.

३. **'मी' चा अविष्कार.**

४. **मुक्तचिंतन.**

५. **लोकसंस्कृती, लोकमानस.**

  ५.१ कौटुंबिक लोकसंस्कृती.

  ५.२ सामाजिक लोकसंस्कृती.

५.३ भावनिक लोकसंस्कृती.

५.४ काल्पनिक लोकसंस्कृती / लोकमानस.

५.५ भविष्यकालीन लोकमानस.

**६. चित्रण स्वरूप विविधता.**

# ※ प्रकरण तिसरे ※

# अरुणा ढेरे यांच्या 'मनातलं आभाळ ' व'आठवणींतले आंगण' या लेखसंग्रहांतील चित्रण विविधता.

३.१ प्रास्ताविक :-

प्रत्येक लेखकाची भाषाशैली भिन्न असते. प्रत्येक लेखकाच्या लेखनाचे विषय हे विविधांगी स्वरूपाचे असतात. अरूणा ढेरे यांचे लेखन हे जीवनाच्या सर्व भागांना स्पर्श करून जाणारे व सहज-सुलभ वाटणाऱ्या भाषेतून जीवनाकडे वाचकाला विचारपूर्वक पहायला शिकवणारे लेखन आहे. शाश्वत-अशाश्वत असे , निसर्गातही मानवीसृष्टी पहायला लावणारे, श्रद्धा; संस्कृती; परंपरा जतन करायला शिकविणारे, अध्यात्मिक दृष्टी विशाल बनवणारे, अबोध पातळीवर निर्माण झालेले, मनाच्या अबोधावस्थेतील विचार शब्दरूपाने प्रकट करणारे लेखन अरूणा ढेरे यांनी केले आहे. त्यांच्या लेखनाचे पैलू स्पष्ट करणाऱ्या 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललितलेखसंग्रहांमधील चित्रण विविधतेचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत. तसेच ग्रामसंस्कृती, लोकसंस्कृती, लोकसाहित्य यांचे दर्शन या ललितलेखसंग्रहांत लेखिकेने आपल्या लेखनाच्या आधारे कसे चित्रित केले आहे हे आपल्याला पाहायचे आहे.


'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललितलेखसंग्रहांमधून लेखिकेने वाचकाला जीवनाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिलेली आहे. तिचा शोध आपण या प्रकरणात घेणार आहोत. बालविश्वापासून ते शाश्वत अशाश्वतापर्यंतचा प्रवास आपण आता करणार आहोत. 'मी' चा अविष्कार, 'आठवणी', 'जीवनातील घटना', 'भेटलेली माणसं' या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ललिततलेखसंग्रहांमध्ये कशा प्रकारे लेखिकेने मांडलेली आहेत. याचा आपण अनुभव घेणार आहोत.

कौटुंबिक, सामाजिक, भावनिक, काल्पनिक, लोकसंस्कृती व लोकमानस या घटकांचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.


मनातळं आभाळ
अरुणा ढेरे

### ३.१.१ 'मनातलं आभाळ':-


शीर्षक वाचल्यावर मनात असं वाटतं की, आपल्याही मनात एक आभाळ आहे. भूतकाळातल्या विचारांचं, अनुभवांचं, कुठतरी दडवुन ठेवलेलं आठवणींचं ! बालपणीच्या साखरगोड गोष्टींचं, तारुण्यातील तरुणसुलभ अवचित घडलेल्या सर्व प्रसंगांचं, मनातल्या स्वप्नांच्या मनोऱ्यांचं, भविष्याच्या उज्वल ध्येयाची वाट पाहणारे एक वास्तव विचारांचं आभाळ, मातीमध्ये निर्माण होऊन सुद्धा आकाशापर्यंत जाऊन भिडण्याची धडपड करणारे संस्कार,धार्मिकता, आलेले अनुभव या साऱ्यांचं एक आभाळ. मित्र-मैत्रिणींच्या सहवासातील गमती-जमतीचं शाळेतलं आभाळ असे हे आपल्याशी निगडीत आभाळ आपल्या मनात वाऱ्याच्या झुळकेसारखं तरळून क्षणात विलीन पावतं. ते आपल्या डोळ्यासमोर उभं राहतं जे आपल्या मनातच असतं आणि मनातचं राहतं.

शीर्षकाच्या पुढे गेल्यावर मुखपृष्ठ पाहताच आपण भूतकाळात गढून जातो. मग्न होतो.हरवून जातो. लहान मूले, त्यांचं विश्व ! त्यातील बालपणीच्या बारीक सारिक गोष्टी, त्यांनी एकत्रितपणे पाहिलेलं चांदण्यांचं आभाळ, एकमेकाला दाखवलेले आकाशातील तारे, मामाच्या गावी जावून बैलगाडीतून केलेली सफर, बाल मित्र-मैत्रिणींमध्ये घालवलेली वेळ, बालपणीच्या गमती-जमती, बालपणीचं विश्व ! या पुस्तकात आहे असे वाटते.

पण, पुस्तक वाचल्यावर असे लक्षात येते की, **''जमिनीपासून विशाल आकाशापर्यंतचे विचार मुखपृष्ठावर चित्राच्या स्वरुपात आलेले आहेत. पुस्तकामध्येही स्वत:च्या विचारातून वेगवेगळ्या गोष्टींपर्यंतचा खोल विचार मांडलेला आहे. तोच विचार मुखपृष्ठावरील चित्रातून प्रतिकात्मक रुपाने प्रकट होतो. त्यामुळे मुखपृष्ठ हे यथार्थ वाटते.''**

भोवती दिसणारे सारे जग आपल्या परिचयाचच असतं पण, त्या परिचयाच्या, ओळखीच्या गोष्टींमधून नवीन सौंदर्याचा, शाश्वताचा खऱ्या गोष्टींचा शोध घेण्याची जीवनवादी दृष्टी आपल्याजवळ असायला हवी. नेमकं हेच अरुणा ढेरे यांनी 'मनातलं आभाळ' मधून ते प्रकट केलं आहे. भोवती दिसणारे सारे जग, नेहमीचं घर, मळलेल्या पायवाटा, रंगीबेरंगी विश्व, वेगवेगळ्या छटा दाखविणारे ढग, मावळती उन्हं आणि रोज होत असते ती संध्याकाळ हे आपल्याला नवे नसते सूर्यास्तदेखील नवा नसतो. पण – तरीदेखील या सगळ्या जुन्या गोष्टींतून नव्याच सौंदर्याचा, नव्या जीवनवादी भूमिकेचा शोध लावण्याचा छोटासा प्रयत्न अरूणा ढेरे यांनी केला आहे.

आपल्याला दिसणारं हे ओळखीचं जग हे कुठंतरी आपल्या मनाचा ठाव गाठतं व त्यातून आपणच नवे होत जातो. पुस्तकाच्या अंतरंगात डोकावून पाहिले असता असे दिसते की, 'सहज काही','माणसं' आणि 'प्रवास' या मथळ्याच्या उपभागांमध्ये छोटे छोटे ललितलेख आहेत.


आठवणींतले
अंगण
अरुणा
ढेरे

### ३.१.२ ''आठवणींतले आंगण''

पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहता क्षणीच आपल्या मनात जुन्या स्मृती दाटून येतात. रंगसंगती इतकी योग्य पद्धतीने केलेली आहे. पारिजातकाची फुलं पाहताच..... घराच्या दारातील पारिजातक आठवतो. त्याखालील सारवणावर पडलेला तो पारिजातकाच्या फुलांचा सडा पडलेला आठवतो. तो मनात कुठेतरी घर करुन बसलेला असतोच. नकळत नाक श्वासोच्छवास घ्यायला लागते व एक सुंदर पारिजातकी सुवास मन मंत्रमुग्ध करुन सोडतो. अलगद आठवणींच्या हिंदोळ्यावर मन झोके घेऊ लागते.

शांत वारा आत्म्याला शांती देऊन जातो.तशातच, आठवणींची कवाडे खुली होतात. व पुराणांतील एक गोष्ट आठवते.

श्रीकृष्ण- सत्य भामा व रुक्मिणी यांची

''पारिजातक माझ्या दारी, फुले का पडती शेजारी.'' या पुराण कथेतून अलगद आपण भूतकाळात शिरतो. भूतकाळावरच भविष्यकाळाची मदार अवलंबून असते. भूतकाळ हाच भविष्याचा पाया असतो. हे जसं एखाद्याच्या जीवनाचे असते तसेच ते संस्कृतीच्या बाबतीतही असते. आत्ताची आपली भारतीय संस्कृतीही पाश्चात्यांचे अनुकरण करत असली तरी, काही ठिकाणी संस्कृतीची जोपासना आजही केली जाते. ग्रामीण भागात ह्या संस्कृतीचा ठेवा असणारे लोकसाहित्य आजही आपल्या दृष्टीस पडते. लोकगीते, लोककथा, दशावतार मंडळी, भारतीय सण हे आजदेखील पूर्वी इतक्याच हौसेने व आनंदाने मंडळींनी जतन करून ठेवलेले आहे.

होळी, बैलपोळा, व्रत-वैकल्ये, सण-समारंभ, नागपंचमी हे सण ग्रामीण भागात आजही उत्साहात साजरे केले जातात. भारताची संस्कृ ती आपल्याला खेडेगावात

रूजलेली व मुरलेली आढळते. या आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा म्हणजेच लोकसाहित्य ! लोकसाहित्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. पूर्वीची माणसे आज आपल्यातून निघून जात आहेत त्यामुळे लोकसाहित्याचा मौखीक ठेवा आपल्यातून ऱ्हास पावत आहे. म्हणून लोकसाहित्याच्या संकलनाची आणि जतनाची भूमिका महत्वाची आहे. ती भूमिका या पुस्तकाच्या लेखनाद्वारे डॉ.अरूणा ढेरे यांनी वठविलेली आहे.

आपल्या पुण्यातील शनिवार वाड्याजवळ राहत असलेल्या घराच्या, आसपासच्या आठवणी या पुस्तकात चित्रीत केल्या आहेत. 'राजबन्सी पाखरू', 'चंद्रावळ आणि राही', 'कुणब्याच्या दु:खाची गाणी', 'पोवाडा-एक लोकात्मक अविष्कार', 'जागरण', 'विधीनाट्य', 'दशावतार-एक अनुभव', 'मराठीतील स्त्री दर्शन', 'रेव्ह.टिळक' आणि 'मराठी किर्तन परंपरा' इ. लेखनातून ढेरे आपल्या गतजीवनातील अनुभवात समरस होतात. बऱ्याच वेळेला या पुस्तकातील लेखन काव्याकडे झुकलेले आहे.

त्यांना मौखिक साहित्य विशेष आकर्षित करते. कुठेही लिखित स्वरुपात नसलेली काव्ये. अडाणी -बायका जात्यावर सुंदर गीत गातात, मंगळा गौरीची गीते त्यांच्या स्मरणात राहतात. आजीच्या-मावशीच्या हातच्या पुरणपोळ्या आधुनिक स्त्रियांना करता येणार नाहीत, असे त्यांना वाटते.शेवटी 'जुने ते सोने' आहे. असे त्यांना वाटते.

एकंदरित त्यांच्या लेखनाने लोकसाहित्याचा वारसा जतन केलेला आहे. त्याला ललितचे वेष्टन घातलेले आहे. त्यामुळे ती कला किंवा तो लोकसाहित्याचा प्रकार आपल्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा राहतो. आापण त्या ग्रामसंस्कृतीत जावून पोहोचतो. बराच कालावधी निघून गेला तरी, ढेरेंच्या लेखनामधील ग्रामजीवन जसेच्या तसे आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. त्यांनी लोक संस्कृतीतील कोडी स्वत:च्या विचारांच्या

आधारे उलघडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कधी साहित्य, कधी मानसशास्त्र, कधी दैवतशास्त्र, तर कधी समाज मानसशास्त्र यांच्या मदतीने ही कोडी उलघडली आहेत. लोकविद्येचा नवा अन्वयार्थ लावता येतो. ललित अंगाने त्या संस्कृतीला चित्रीत करण्याचा एक प्रयत्न अरुणा ढेरे यांनी केला आहे.

**३.२ लेखसंग्रहांतील चित्रण विविधता :-**

**३.२.१ बालविश्वाचे चित्रण**

**'मनातलं आभाळ':-**

लेखिकेच्या लहानपणी जे पाहिलं, अनुभवलं ते बालपण शब्दात पकडलं व बंदिस्त केलं आहे.अरूणा ढेरे यांना सुचलेला उन्हातला नाच, पाना फुलांचा नाच हा त्यांच्या प्रतिभेतला स्वनिर्मित शब्द आहे.

१. उन्हाचा नाच, पानाफुलांचा नाच. हा अरूणा ढेरे यांच्या स्वत:च्या मनातला, त्यांना सुचलेला नाच.

२. **शेणाचे सारवण :-** 'कितीकदा जवळच्या गोठयातून बादल्या भरून शेण आणत असू आम्ही. तजेलदार रंगाचं शेण.रस्त्यावरून जाणाऱ्या गाईनं नुकतंच टाकलेलं शेणही कितीतरी वेळा मोह न आवरून उचललं आहे मी. ती उष्ण वासाची मऊ वर्तुळं कशी पहावीशी वाटायची. अंगणभर मग शेणसडा, सारवण. सगळ्यांच्या दारापुढं रांगोळी घालण्याचं काम माझ्याकडं. पाच सहा घरच्या काकू आणि वहिनी जातीच्या बायका आंगण सारवून दमल्या की, माझ्यासाठी रांगोळी गुलाल आणून ठेवायच्या आणि कामाला लागायच्या. मग त्या ओलसर अंगणात शुभ्र रांगोळीची चिमुट सोडत मी कितीतरी वेळ रमून जायची.'[१]

३. 'भल्या पहाटे उठून शुक्राचा तारा पाहणं. शनिवारवाड्याचे दार उघडताच आत धाव घेऊन बकुळीच्या फुलांनी झग्याचा घेर भरून घेणं. सकाळभर गजरे करून संध्याकाळी ते माळून मिरवणं, गुलबक्षी आणि कोरांटीच्या वेण्या न् गजरे गुंफण्यासाठी गगन मोगऱ्याची फुलं वेचून आणणं त्या वेळा फुलवेळाच होत्या.'[२]

४. पानाफुलांचा नाच करणे, रांगोळी काढणे, फुले वेचण्याच्या वेळेला फुलवेळा हे नाव सुचणे हे लेखिकेच्या प्रतिभेचे पैलू दर्शवितात.

आज कवितेच्या क्षेत्रात लेखिकेने केलेल्या प्रगतीचे मूळ तिच्या बालपणीच्या निसर्गाची हाक ऐकून हो म्हटल्यामुळं. ''माझ्या लहानपणी जिवाला आभाळाचा निळा पुसटसा स्पर्श लागून गेला. आणि बगळ्याच्या पंखावरची तकाकी माझ्या कवितेच्या बोटावर उतरली. यापेक्षा आणखी कायं हवं ?''[३]

आंगणात पांघरूणं – अंथरूणं पडायची, त्यावेळी लेखिका आपल्या भावंडांसह पडल्या–पडल्या आभाळाचं निरीक्षण करायची ते वर्णन, भल्या पहाटे शुक्राचा ठळक तारा पहाणे या गोष्टीतून लेखिका आपल्याला नकळत भूतकाळातल्या बालविश्वात पोहोचवते.'कलर पर्पल'चित्रपटाचे अतिशय मोजक्या व योग्य शब्दात केलेले वर्णन, वडगाव ते निगडीचा प्रवास, बैलगाडीच्या प्रवासात आभाळाचं केलेलं निरीक्षण यथायोग्य वाटते.

**निसर्ग शक्तीचं एक विराट दर्शन म्हणजे आभाळ. मारणारे आणि तारणारे, स्फुर्ती देणारे आणि भयचकीत करणारे, अलोट देणारे आणि अनपेक्षित हिरावून घेणारे. निसर्गाचे एक विशाल रूप आभाळ.** संध्याकाळ तर उदासवाणी असते. अंधार पडत असतो. पक्षी घरट्याकडे, गाई गोठ्याकडे तर बाहेर गेलेल्या बाई–माणसांचे समूह घराकडे परतत असतात. तरीही संध्याकाळचे रम्यवर्णन लेखिकेने केले आहे. सागर, सुर्याचे बिंब यांचे वर्णन

छान केले आहे. त्यांच्या बालपणीचं जग त्यांनी इतक्या प्रभावीपणे वर्णन केलेले आहे. की, वाचकाची मती तेथे खुंटित होते. वाचता वाचता वाचक स्वत:च्या भूतकाळात हरवतो, तेथून तो आपल्या बालपणात प्रवेश करतो व त्याच्या घटना, प्रसंग आपल्या जीवनातही अशाच पध्दतीच्या घडल्या आहेत. याची त्यावेळी त्याला पूर्ण जाणीव होते व वाचकच लेखक बनतो. हे मीच लिहिलेले आहे. माझ्या मनाच्या अबोध पातळीतले हे सारे विचार इथे एकत्रित गवसलेले आहेत. अशी त्याच्या मनाची अवस्था होते व इथेच लेखिकेचा विजय होतो. त्यांनी त्यांच्या लेखनातून जे साधायचे ते साधले असे वाटते.

**आठवणींतले आंगण :**

'' झाडे, विष्णूचे देऊळ, प्रचंड दगडी विहीर आणि दिंडी दरवाजा असा एक छानसा वाडा. आता त्या वाड्याची नांदती संपन्न कळाच नाहीशी झाली आहे; पण अवघ्या वीस–बावीस वर्षांपूर्वी आम्ही दहा–बारा घरच्या मुली , परकर खोचून आई–वहिन्यांच्या बरोबरीने भली थोरली दोन्ही आंगणे शेणाने सारवून काढत असू. प्रत्येक घराच्या दारापुढे मग हौसेने रेखलेली, रंग भरलेली रांगोळी.''

''भल्या पहाटे दळणाचे जाते घरघरत असताना, पशा–पायलीने पीठ दळत असताना आई–आजीच्या तोंडून ओवी ऐकावी. उन्हाळ्यातल्या दुपारी माजघरात मुसळे खालीवर होत असताना कुटाणा घरभर उधळत असताना ओवी ऐकावी आणि कधी बाहेर पावसाने सतत धार धरलेली असताना संध्याकाळी देवापासच्या उजेडात बाळाला मांडीवर घेऊन कुणी मावशी–मामीने म्हटलेली ओवी ऐकावी. तिने ओवीतून केलेली चुड्याच्या कौतुकाची, कुंकवाच्या अखंडपणाची आणि अहेव मरणाची मागणी ऐकताना.......''[४]

''मी भराड्याचे गाणे ऐकले. मला लोककथांमधून व लोकगीतांमधून भेटणारे शंकर पार्वतीचे जोडपे फार आवडे. ''

''मनाला भिडणारी फेराची गाणी. ती देखील अधिक करून पंचमीच्या फेराची, तशी हादग्याच्याही फेराची. माझे लहानपण आणि कळते-नकळते असे संधिवय या गाण्यांनी भर भरून उमलवले आहे.आणि उमलण्यातल्या सूक्ष्म, कोवळया अशा दु:खाची कळही मला लावली आहे.''[५]

''या बाहुल्यांच्या माध्यामातून मूल आपले जाणीवेचे विश्व कसे व्यक्त करायला शिकते? त्याला ते कोण शिकवते ? कुणीच नाही.पण हे घडते खरे.आपल्या अजाण डोळयांनी जग न्याहाळताना आणि चिमुकल्या संज्ञेने एकेक अनुभव आकळण्याचा प्रयत्न करताना त्या मुलाचे सगळे विचार सगळया भावना व्यक्त होतात. त्या बाहुलीमधून त्या मुलाची धडपड चालू असते ती या बाहुल्यांच्याव्दारा जीवन नाट्य व्यक्त करण्याची. त्याच्या डोळयांना दिसणारे आणि मनाला कळणारे प्रौढांचे सर्व विश्व ते मूल बाहुल्यांच्या नाट्यातून पुर्नघटित करू पहाते.''

''या नाट्याचा अविभाज्य अंश जशा त्या बाहुल्या असतात, तसेच ते मूलही असते. त्याच्या भातुकलीच्या खेळात मग प्रौढजगातल्या माणसांचे प्रातिनिधिक स्वरूपात अनुकरण केले जाते. बाहुल्या निर्जीव आणि मुले सजीव असा भेद त्या खेळात मुळी उरतच नाही. एका समान चैतन्याच्या पातळीवर भूमिका आपोआप घडविल्या जातात. आई, बाबा, वधू, वर, बाळ अशा असंख्य भूमिका !''[६]

अरूणा ढेरे यांच्या बालपणीचं जग आठवणींतले आंगण मधून चित्रीत केलेलं आहे. त्यांच्या आजू-बाजूला कायम वास करणारे लोकसाहित्य. लहानपणीच्या आठवणी

त्यांनी या पुस्तकात लिहिल्या आहेत. पोवडा, जात्यावरच्या ओव्या, पंचमीची गाणी, गौरीगीते, लोकगीते त्यांनी त्यांच्या बालपणी ऐकले. घरातील मोठ्या बायकांच्या तोंडून जात्यावरच्या ओव्या, म्हणी, उखाणे ऐकले. बाहुलीचा खेळ खेळला. कीर्तन पुराण श्रवण केले. पिंगळा–पाहिला, दशावतार पाहिला. ह्या सर्व गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या ह्या संस्कारांची जोड लाभलेले बालपण त्यांना लाभले. आणि ते आठवणींतल्या आंगण मधून कुठून तरी मधे मधे डोके वर काढते व त्यावेळी असे सांगून जाते की, 'हे मी लहानपणी जवळून अनुभवलेले आहे. आणि त्याची तोड कशाशी करता येत नाही असं हे सुंदर लोकसाहित्य आहे.'

**३.२.२ श्रद्धा, संस्कृती परंपरांचे चित्रण :–**

'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या दोन्ही ललित लेखसंग्रहांतून परंपरेचे चित्रण त्यांनी केले आहे. ग्रामीण भागातील संस्कृती म्हणजेच लोकसंस्कृती तिचे यथार्थ वर्णन त्यांनी केले आहे.

परंपरेने चालत आलेल्या घटना ग्रामजीवनात घडत असतात. थंडीतल्या पहाटे दारी येणारा पिंगळा,दर शनिवारी येणारा वासुदेव व त्याची गाणी, भूत्ये गोंधळी दर रविवारी एकतारी घेवुन येणारा भिक्षेकरी म्हातारा जुनी सुरेल गाणी गात सावलीला बसे,दर शुक्रवारी एक रामदासी बाबा श्लोक म्हणत येई. ही परंपरा ग्रामजीवनात आढळते. तिचे चित्रण लेखिकेने केले आहे.

नागपंचमीच्या आगे मागे महिनाभर घुमणारी फेराची गाणी, लग्नानंतर घातला जाणारा देवीचा गोंधळ, संक्रांतीला उतू जाणारे बोळक्यातले दुध, दिवाळीनंतर दाराबाहेर पुजले जाणारे शेणाचे पांडव,धडधडून पेटणारी सामुदायिक होळी हे लेखिकेने अनुभवलेले आहे.ते शब्दात मांडले आहे.

लोकगीते, लोकरुढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा पुराण, कीर्तन, दशावतार, बाहुल्यांचा खेळ, ओव्या, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, पिंगुळी, वासुदेव , भुत्ये, यांची गाणी लळीत ,गोंधळ,जागरण, विधी, पोवाडा, गौरी–गणपती , दिवाळी, कहाण्या या सर्व लोकसाहित्यातील घटकांचा समावेश त्यांच्या लेखनात आला आहे.

बालपण आणी आंगण, बालभावविश्व सतत त्यांच्या लेखनातून प्रकटते.त्यांच्या अवती–भवती असणाऱ्या समाजाचे शब्दचित्र त्यांच्या लेखणीतून उमटलेले आहे.

**३.२.३ लोकसाहित्याचा अनमोल ठेवा जतन करणारे चित्रण :–**

लोकगीते, लोककथा, दैवतकथा, पुराणकथा, स्त्री–गीते, गोंधळी, भुत्ये दशावतार, पिंगुळी, कीर्तन, पोवाडे, बाहुल्या, जागरण यांसारखे लोकसाहित्याचे घटक लेखिकेने आठवणींतल्या अंगणात जपून ठेवले आहे.

सातवाहनांच्या गाथासप्तशतीतल्या लहानशा गाथेमध्ये गोदावरी नदीचे केलेले सौंदर्य वर्णन तसेच स्त्री हे नदीचे रुप आहे अशी लोककथा मनातले आभाळ मध्ये लेखिकेने सांगितली आहे. कुण्या एका लोककथेतील गुप्तधनाची गोष्ट ही लेखिकेच्या कविताश्रीमंतीला कारणीभूत आहे. असा उल्लेख लेखिकेने केला आहे. लोकसाहित्याचं जन्मस्थान असलेलं खेंड किंवा गाव लेखिकेनं आपल्या समोर जसच्या तसं उभं केलं आहे. श्रावण सरींचा ऐश्वर्यसंपन्न मेघ, श्रावणातील व्रत–वैकल्ये, मंगळागौरीची गाणी, जागरण, उपवास, भेंडया झिम्मा, फुगडया, फेर आणि मजेदार खेळ, पंचमीच्या फेरांची गाणी 'श्रावणसरी' मध्ये लेखिकेने उल्लेखलेली आहेत.

''आसपासच्या तमाम बायकांची कसली कसली व्रतं सुरू व्हायची. कुणाची आडितवारची पूजा, कुणाची शिवामूठ, कुणाचे कसले तर कुणाचे कसले उपवास शिवाय मंगळागौरींचे खेळ आणि जागरणं ! श्रावणाचा पाऊस लहरीच. त्यानं मोकळीक दिली, तर मग गाण्यांच्या भेंड्या, फुगड्या, झिम्मा फेर आणि असंख्य मजेदार खेळ. पंचमीच्या फेरांची दिवसेंदिवस चाललेली गाणीदेखील याच मोकळ्या उत्साहात भरलेली असायची.''[७]

दिवाळी सण, गणपतीचा सण, पंचमीचा सण, अशा सणांविषयीचे सविस्तर विचार त्यांच्या लेखनातून अवतरलेले आहेत.

''खिस्ताचं पुनरूत्थान ही मृत्यूवर जीवनाच्या प्रेमानं मिळवलेल्या विजयाची सर्वात मधूर पुराणकथा आहे.''[८]

''पुराणकथा आणि दंतकथा यांचे माहेरघर, ऋषिमुनींच्या वास्तव्याचं, देवकथांच्या दिव्यत्वाचं आणि इतिहासातल्या रोमहर्षक घटना-प्रसंगाचं गहनगूढ भांडार म्हणजेच कालिंजरचा परिसर होय.''[९]

''चित्रकूट हे असचं रामायण नावाच्या महाकाव्याचं गाव आहे.''[१०]

वरिल सर्व संदर्भातून असे दिसून येते की, मनातलं आभाळ मध्ये देखील त्यांचं लोकसाहित्य भरून उरलेलं आहे. आठवणींतले आंगण मध्ये तर त्यांनी लोकसाहित्यातीलच सर्व घटकांविषयी लेखन केले आहे. असे आपणांस दिसून येते.

**३.२.४ निसर्ग चित्रण :-**

मनातलं आभाळ व आठवणींतले आंगण या शीर्षकातच निसर्ग लपलेला आहे. आभाळ आणि आंगण हे निसर्गाचेच घटक आहेत. निसर्गातील पशू, पक्षी, झाडे, वेली यांच्या सहवासात माणसाला स्वतःचे दु:ख विसरायला होते असे लेखिकेला वाटते.

गुलाबाची पाने, पानाफुलांचा नाच,फुलवेळा, बकुळीच्या फुलांनी भरलेला झग्याचा घेर, झेंडू, गोकर्ण, सदाफुली, यानं सजवलेला देव, फुलचुरव्या, होले, कोकीळ आणि भारव्दाज या पाखरांनी घरी केलेली नांदती वस्ती, मुंगुसाचं कुटुंब आणि आंगणात पांघरूणं-अंथरूणं पडल्यानंतर पाहिलेलं आभाळ, तारे, शुक्र हे सर्व निसर्गातीलच घटक आहेत.मानव हा निसर्गापासून अलिप्त राहूच शकत नाही. निसर्ग आणि मानवी जीवन हे एकरूप झालेले आहेत. निसर्गातून मानवाला स्वत:ला विसरण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. हे सत्य लेखिकेच्या लेखनातून क्षणोक्षणी जाणवते.

माणसाला शतरूपांनी सुखावणारा पाऊस, मनातल्या असोशीचं, इच्छांचं सुंदर अनुभवांचं रूप असावं असा एक ओला श्रावण, पहिल्या वहिल्या माणसांना 'जीवन' देणारी, कुणाची बायको, कुणाची आई,गर्भवतीची ओटी भरण्याच्या महोत्सवाची साक्षी अशी ही नदी, कोकीळ पक्षाची साद सुखाचं सगळं मर्म टिपून घेणारी आहे. बालकवींची कविता ही निसर्गाप्रमाणे निरागस आहे, खजुराहो एक पर्यटनस्थळ, भव्य पाषाणकडयांचं; उग्र अरण्यांचं आणि अंधार गुहांचं आर्कषण असणारा कालिंजरचा परिसर, गर्द हिरव्या झाडीनं भरलेल्या अरण्यातून दिसणारं चित्रकूट हे गाव.

''उंच काठावरच्या हिरव्यागर्द झाडांनी अलगद पाण्यात सोडलेली प्रतिबिंब, खालच्या बाजूला पलीकडे पिवळसर मऊ वाळवंटाचा विस्तार आणि उजव्या हाताला शुभ्र पांढरा उत्तरादि मठ.''[११]

उडुपी येथील कृष्ण मंदिराचा परिसर, नागरकोईल येथील नागमंदिराचा परिसर, ''थांबू या इथे थोडा वेळ ! पाहू या का?'' असे लेखिकेच्या तोंडून उद्‌गार निघालेले ते तेरवाड हे गाव, मालगुंड हे नारळी-पोफळींच्या नि आंब्या-फणसांच्या बागांनी समृद्‌ध

असलेले गाव. तसेच, वर काळं आभाळ आणि त्याच्याखाली गर्द हिरवा डोंगरमाथा, म्हणजेच सज्जनगड होय. शेतशिवाराशी जोडलेले बाईचे आयुष्य,

''फार वर्षांपूर्वी ऐकलेले भराड्याचे एक गाणे मला अजून आठवते. पावसाळा सरलेला, भाद्रपदातले गौरी-गणपती वाजत गाजत येऊन गेलेले. नवरात्र दारात थांबलेली आणि अश्विनाच्या चमकत्या उन्हावर येत्या कार्तिकातल्या दिव्यांची स्वप्ने आरास मांडून राहिलेली. आपल्याही मनात पावसाच्या हिरव्या गारव्यासारखी तृप्ती मुरलेली आहे.''[१२]

''दक्षिण कोकणची गडद लाल माती अशा ऐश्वर्यवान् वनश्रीने नटून समोर आली की, थक्क व्हावे. कुठे लाल-गुलाबी पालवीने नखशिखान्त झळझळणारी झाडे, कुठे टवटवीत पानांचे ओलसर तजेल्याने माखलेले झुबके. कुठे करवंदी जाळीदार चांदण्यागत फुललेली कुंदाची फुले, तर कुठे एग्झिराचे मनसोक्त तरारलेले केशरी तुरे!''[१३]

अशा प्रकारे मनातलं आभाळ व आठवणींतले आंगण मधून लेखिकेने निसर्गचित्रण केलेले आहे. वाचकाला त्या-त्या ठिकाणच्या निसर्गातून सफर करून आल्याचे समाधान लाभते. वाचक प्रफुल्लित होतो.

**३.२.५ धार्मिकता दर्शविणारे चित्रण :-**

आमच्या लहानपणी संतांचे अभंग ऐकताना मन थरथरून जायचं. श्रावणात कितीतरी कीर्तन-प्रवचनांची नुसती झुम्मड असायची.

''आवेगी पाणी पाहताना तृप्तीलाच अतृप्तीची तहान लागावी तसं स्त्रीच्या प्रेमाचं एक मन:पूर्वक रूप मला समजून आलं आणि मग नदीला बाई म्हणून आपण माणसांनी कसं पाहिलं-पुजलं आहे, हेही मला हळूहळू उलघडू लागलं.''[१४]

''स्वत:चाच दिवा करून स्वत:ची वाट उजळण्याचा संदेश दिवाळीच्या रात्रीनं इतका देखणा आणि इतका हर्षोत्फूल्ल करून आपल्याला दिला आहे की, अवसेच्या अंधाराचा सगळा हताशपणा आणि निराशा आपोआप विसरून गेलो आहोत. गती हा जिवंत पावलांचा धर्म आहे.''[१५]

जे अमर आहे, शाश्वत आहे, त्याच्या दर्शनासाठी माणसाचं अंतर्मन सदैव उत्कंठित आहे. त्याची चाहुल, त्याच्या पाऊलखुणा सगुण देवांच्या रूपानं मानवजात पुजत आली आहे.

''पाऊल म्हणजे पादमूल हेच समग्र अस्तित्वाचं प्रतीक होऊन राहिलं. आत्मतत्वाचं प्रतीक होऊन राहिलं. नुसत्या चरणांचं प्रतीक आमच्यासाठी पुरेसं झालं.''[१६]

**३.२.६ निसर्गाकडून दैववादाकडे झुकलेले चित्रण :-**

**मनातलं आभाळ :**

''सृष्टीचा आरंभच मुळी चैतन्याच्या विघटनातून झाला आहे. आदिपुरुषानं स्वत:चं शरीर विभागलं आणि स्त्री - पुरूषांची निमिर्ती झाली. अंधार आणि पाणी यांच्या अर्थशून्य कल्लोळातून अर्थपूर्ण सृष्टी तयार झाली. मुळात जे होतं ते तुटलं, मोडलं, त्याचे तुकडे झाले, ते दुसऱ्या कशात तरी मिसळलं, संपलं आणि नवंच काही त्यातून जन्माला आलं.

म्हणून मृत्यू जेथे आहे तिथे निर्मितीही आहे. पण वरवर पाहता माणसाला भीती वाटते मृत्यूची. मोडतोड विघटन नको वाटतं; त्याला मरण शोककारी वाटतं. संस्कृतीनं वर्षातला एक सण असा दिला आहे की, या दिवशी तरी मृत्यूच्या पोटी दडलेल्या मंगल

अर्थाची जाणीव माणसाला व्हावी. मृत्यूनं ग्रासलेल्या जीवनाच्या निर्माण क्षमतेवर त्यानं विश्वास ठेवावा आणि निर्मितीचं मायपोट म्हणून मृत्यूचा गौरव करावा.

''लेखिकेच्या दारातला लहानला आंबा दरवर्षी लाल गुलाबी पालवीनं जेव्हा डवरुन येतो, तेव्हा हटकून कोकिळ त्या पानांआडून साद घालत राहतोच. शाश्वतानं अशाश्वताला घातलेली ती साद असते. किती सुंदर ! किती करुणामय.!''[१७] असा उत्तुंग पातळीचा विचार लेखिका करते. दैनंदिन जीवनात आढळणाऱ्या छोट्या- छोट्या गोष्टींमधून मोठा अर्थ लावण्याचा लेखिकेचा गुण आपणांस येथे दिसून येतो. त्याशिवाय, निसर्गामध्येदेखील शाश्वत अशाश्वताचा शोध लेखिकेचे लेखन घेत असल्याचे आपणांस प्रत्ययास येते.

''पर्वतीय प्रदेशांमधल्या एकांतात, अरण्याच्या गर्भातून केलेल्या संचारात आणि नाना रुपांत प्रकटणाऱ्या पाण्याच्या सहवासात, प्राचीन ऋषींच्या प्रत्ययाला आलेला सृष्टीचा आत्मा, उपनिषदांत विराट विस्मयाच्या रुपात दिसतो.''[१८]

दैववाद किंवा श्रद्धा आणि सृष्टीतल्या चैतन्यशक्तीचा परिचय प्रतीकांमधून करुन घेऊ पाहणारी प्रगल्भ चिंतनात्मक जाणीव अरुणा ढेरे यांच्या लेखनात आढळते.

**आठवर्णीतले आंगण :**

मुळात माणसाने मृत्यू ही गोष्टच फार स्वाभाविक रीतीने स्वीकारली आहे. मृत्यू म्हणजे नव्या जीवनाची सुरूवात. मरणाने काही थांबत नाही. काही कायम करिता संपत नाही. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांचे चक्र अखंड फिरत असते. माणसाने फार प्राचीन काळापासून हे जाणले आहे की, झाडे पाने गाळतात; बोडकी होतात आणि नव्या पालवीने पुन्हा डवरतात. फुले गळतात आणि त्या जागी नवी फळे रुप धरतात. फळांतल्या बिया

मातीत उडी घेतात आणि नव्या वनस्पती रुजून येतात. नद्या अविरत वाहतात. तारे अक्षय लुकलुकतात. सूर्य – चंद्र मावळतात, पण पुन्हा उगवतात. दिवस सरतो, रात्र पसरते, पण पुन्हा तिच्या गर्भातून नव्या दिवसाचा जन्म होतो. म्हणून लोकजीवनाने मृत्यूला सहज साधेपणाने स्वीकारले.''[१९]

निसर्गाकडून दैववादाकडे झुकलेले लेखन अरुणा ढेरे यांनी केले आहे. निसर्ग आणि शाश्वत सत्य असा दैववाद यांचा परस्परसंबंध लेखिकेने दाखविलेला आहे.

**३.२.७ काल आणि आज फरक दर्शविणारे चित्रण :–**

**'मनातलं आभाळ'**

१) ''आजच्या वास्तवातून मला जुन्या श्रावण चैतन्याचा प्रत्यय येत नाही. लोकांच्या मनात श्रावणाच्या निमित्तानं उठलेल्या उत्साहाचा, आनंदाचा, भरभरुन ओसंडण्याचा प्रत्यय येत नाही. समूह जीवनाला तेव्हा श्रावणसरींनी जो सुंदर भावनात्मक ओलावा, आपलेपणा आणि उत्साह दिला होता, तो दिसत नाही, तो हरवलेलाच आहे आमच्यातून शिवाय फुरसतीचा वेळही हरवला आहे.''[२०]

२) ''मुठा त्यावेळी आजच्या इतकी परकी आणि अस्वच्छ नव्हती. घाटांवरची देवळं उदास नव्हती.''[२१]

३) ''पूर्वी गाईची पावलं मांगल्याचं प्रतीक म्हणून दारापाशी रांगोळीतून काढत असत. त्या पावलांच्या रुपानं लक्ष्मी घरी आली वा भाग्याची खूण ठरली. '' असा समज पूर्वीच्या काळी होता. पण....... आज, पावलं ही वेगवेगळ्या दिशेने व उन्मत्तपणे पडत आहेत. अविवेकी आणि अहंकारी अशा शक्तीनं आपल्या पावलांनी शुभंकरालाच ठोकर दिली. त्यातूनच शूद्र जात निर्माण केली गेली. या गोष्टीचं लेखिकेला वाईट वाटतं.''[२२]

४) ''पूर्वीच्या काळातील लोक मन:पूर्वक, चिकित्सकपणे आणि मूल्यनिष्ठेनं काम करत असत. य.न.पेशवे व रियासतकार सरदेसाई यांच्यामध्ये वाद झाला तो 'केसरी'तून गाजला. पर आजच्या वृत्तपत्रांतून नुसता कचरा ! व न वाचण्यासारखी भाषा असते. भाषेच्या शुद्धतेकडे सुद्धा लक्ष दिलेले नसते.''[२३]

५) ''एकेकाळी निर्माणशक्तीची म्हणजे 'स्त्री'ची म्हणजेच 'स्त्री'च्या योनीची पूजा बांधत पण आज पुरूषदेवाचं महत्व वाढलं व लिंगपूजेला महत्व प्राप्त झाले. एकेकाळची सामर्थ्यवान व प्रभावी शक्तीच्या उपासनेची संस्कृती पडत-झडत पूर्ण उद्ध्वस्त होते. हे विचार व फरक लेखिकेला काल आणि आज वाटतो.''[२४]

**आठवणींतले आंगण**

१) ''समईच्या थरथरत्या उजेडात, थरथरत्या आवाजात आजीने सांगितलेल्या कहाणीचा ताल कानामनात रेंगाळत जावा. वासरासारखे आईच्या छातीशी बिलगून बसत, एखाद्या अज्ञात नादातून यावी तशी येणारी मंत्रमुग्धता अनुभवत असावे. व्यथा सोसण्याचे बळ मिळवून देणाऱ्या श्रद्धागर्भ भाविकतेतून हा कसला दुखरा आनंद मिळतो, याचा विचार करीत असावे. हे असले दिवस आता राहिलेले नाहीत. असे लेखिकेला वाटते आता पुण्या-मुंबईसारख्या शहरी भागांमधून कहाण्यांची गोडी उरलेली नाही. बदलत्या जीवनप्रवाहात यांचा ओघ आटत गेला आहे. अशी खंत लेखिकेला वाटते.'' [२५]

२) ''मोटा, बैलगाड्या, गुरे-वासरे, शेत शिवारे, गावचे बलुतेदार, देव-देवस्की, सण-उत्सव, घरकामे, शेजारणी-पाजारणी यांनी व्यापलेले ओवींमधले जग म्हटले तर

ओळखीचे, पण शहरीकरणाच्या झपाट्यात अनोळखी होत चाललेले आहे. ते स्वप्नाइतकेच अदभुत आहे असे लेखिकेला वाटते.''[२६]

३) ''आजच्या बदलत्या समाजव्यवस्थेत शाहीर खूप दूर फेकले गेले आहेत. नव्या जमान्यानुसार बदलण्याच्या प्रयत्नात शाहीरी काव्य उथळ आणि कंटाळवाणे होत चालले आहे. अशी खंत लेखिकेला वाटते.''[२७]

४) ''स्वच्छ सारवलेल्या अंगणात गार गोळा झालेला, एका बाजूला पाच उसाचे तिकाटणे, गव्हाच्या राशीवर भरलेले दोन घट, देवाचे टाक तिथेच पुजलेले, दिवटी फुरफुरत पेटलेली, वर आभाळाचा काळातंबू ताणून घातलेला, चांदण्याची झालर चमक चमक करणारी, आंगणभर पसरलेला मंद प्रकाश आणि दाटीने बसलेल्या गावकऱ्यांच्या भावूक मनांमधून खंजिरीची थाप घुमवणारे वाघ्ये...... हे दृश्य आता फारसे पहायला मिळणार नाही. आजच्या शहरी लोकांना तर ते पूर्ण अपरिचित आहे. असा ग्रामसंस्कृती, जीवन व शहरी जीवन यांच्यातील फरक लेखिकेला जाणवतो.''[२८]

५) ''दशावतार हा रंजनप्रकार लोप पावत चाललेला आहे. व नवे रंजनप्रकार उदयास येत आहेत. या गोष्टीचे दु:ख लेखिकेला होते.''[२९]

६) ''गोंधळी, भराडी, शाहिर हे कलावंत पोटापाण्याच्या उद्योगात रमले आहेत. व त्यामुळे त्यांची कला ही निकामी झाली आहे. व परांपरागत कला वारसा अडगळीत पडला असे लेखिकेला वाटते.''[३०]

७) ''जीवनपद्धतीत कीर्तनाचे सद्य:कालीन रूप लक्षणीय आहे.''[३१]

अरूणा ढेरे यांच्या विचारात सातत्याने काल आणि आज यांची तुलना दिसून येते. काल म्हणजेच जुनं हे सोनं आहे ते आजही आठवणींनी जपलं पाहिजे असं लेखिकेला वाटते.

**३.२.८ शाश्वत आणि अशाश्वत दर्शन घडविणारे चित्रण :-**

''एखादा कृष्ण, एखादा बुद्ध, एखादा ज्ञानेश्वर...... एखाद्यालाच लागते ती खरीखुरी तहान, जिच्या मागून व्याकूळ होऊन धुंडत जाणाऱ्याला अक्षय सुखाचं 'जीवन' भेटत. ती तहान तर योग्यांची तहान असते. आणि खरं म्हणजे जीवनानं मस्त होणाऱ्या भोग्यांचीही तहान असते!''[३२]

''स्त्री जातीच्या ठायी सहसा न आढळणारं दुर्मिळ साहस माझ्यातून कसं उफाळलं आणि त्याच्या भाग्याचं सार्थक मी कसं केलं. असं स्वत:लाच वाटून घेणारी प्रेयसी प्रियकराच्या ओढीने त्याला गळामिठी घालण्यासाठी गोदावरीचा विस्तिर्ण प्रवाह पोहून पलीकडे रात्री जाते. नदीनंच घडवलेलं हे प्रेमाचं साक्षात्कारी दर्शन म्हणून तिच्या वाहत्या जीवनप्रवाहाशी पुन्हा नम्रही होतो.''[३३]

या उदाहरणातून मुमूक्षूच्या उदात्ततेकडे नेणारा विचार लेखिका व्यक्त करते. तसेच इच्छाशक्ती प्रबळ असेल तर, माणूस कोणतेही असाध्य कार्य साध्य करू शकतो. विस्तीर्ण वडाच्या झाडाचे अस्तित्व त्याच्या एवढ्याशा बी मध्ये दडलेलं असतं. त्याला पाणी, हवा, प्रकाश मिळाल्यावरच त्याचे रूपांतर अवाढव्य अशा वडाच्या वृक्षात होते. त्याप्रमाणेच, माणसाच्या ठिकाणी असणारी अद्‌भूत शक्ती ही प्रसंगावधानपणे व परिस्थितीनुरूप प्रकट होत असते. हे वरील उदाहरणातून स्पष्टपणे दिसून येते.

''सृष्टीचा आरंभच मुळी चैतन्याच्या विघटनातून झाला आहे. आदिपुरूषानं स्वत:चे शरीर विभागलं आणि स्त्री-पुरूषांची निर्मिती झाली. अंधार आणि पाणी यांच्या अर्थशून्य कल्लोळातून अर्थपूर्ण सृष्टी तयार झाली. मुळात जे होतं ते तुटलं, मोडलं, त्याचे तुकडे झाले, ते दुसऱ्या कशात तरी मिसळलं, संपलं आणि नवंच काही त्यातून जन्माला आलं. म्हणून मृत्यू तेथे आहे तिथे निर्मिती ही आहे. पण वरवर पाहता माणसाला भिती वाटते मृत्यूची. मोडतोड, विघटन नको वाटतं. त्याला मरण शोककारी वाटतं. संस्कृतीनं वर्षातला एक सण असा दिला आहे की, या दिवशी तरी मृत्यूच्या पोटी दडलेल्या मंगल अर्थाची जाणीव माणसाला व्हावी. मृत्यूनं ग्रासलेल्या जीवनाच्या निर्माण क्षमतेवर त्यानं विश्वास ठेवावा आणि निर्मितीचं मायपोट म्हणून मृत्यूचा गौरव करावा.''[३४]

''अक्क महादेवी यांनी केलेला जीवन प्रवास म्हणजेच एका वस्तूरूप, निर्जीव अशा उपभोग्य अस्तित्वापासून लसलसत्या सर्व समर्थ चैतन्यापर्यंतचा हा प्रवास! असे लेखिकेला वाटते. ''[३५]

अशाश्वत अशा गोष्टींसाठी मन व्याकूळ होऊन उठतं। गोष्टी अशा, की ज्या काठोकाठ सुखद आहेत, पण मिटून जाणार आहेत. त्या बरोबरच निसर्गाचा मानवी जीवनाशी जोडलेला संबंध अतूट आहे.

''जमिनीला फळवतो पाऊस, म्हणून तर त्या आकाशस्थ मेघरायाचं आणि माती-पाण्याचं नातं साध्यासुध्या स्त्रींन देखील मोठ्या कौतूकानं गायलं आहे.''[३६]

''प्रयागच्या संगमातील एखादी लाट बनून महादेवी एव्हाना समुद्राला मिळाल्या. समुद्रही झाल्या असतील. या ओळींतून आपल्याला अरूणा ढेरे यांनी मानवी जीवनाला दिलेली निसर्गाची उपमा स्पष्ट होते.''[३७]

मानवी जीवनाचा व निसर्गाचा संबंध दृढ आहे. निसर्गावर आधारितच मानवाचे जीवन आहे. हे सत्य कधीही नाकारता येणार नाही. मानवी जीवनातील घटना, प्रसंग यांना निसर्गाची उपमा लेखिकेने दिलेली आहे. जसे निसर्गाचे रंग भराभर पालटतात त्याप्रमाणे मानवी जीवनाचे रंगसुद्धा पालटतात. निसर्गाच्या सावळ्या छायेत म्हणजेच संवेदनांच्या हलक्या व तरल आणि गूढ मानवी जीवनासारखेच निसर्गाचे संधिकाळाचे रूप असते. हे कवितेत टिपणारे बालकवी! त्यांची कविता कितीही प्रखर जीवन तत्वज्ञान सांगणारी असली तरी ती प्रौढ नाही, कुमार नाही, बालकविताच ठरते. असे लेखिकेला वाटते.

**३.३ 'मी' चा अविष्कार :-**

लेखिकेनं स्वत: अनुभवलेलं विश्व, मग ते बालपणीचे असो वा आयुष्याच्या कुठल्याही काळाचं असो ते लेखिकेने जसं पाहिलं, जसं अनुभवलं तसं वाचकांसमोर प्रकट केलं आहे. आपल्याला समोर एक विचार, गोष्ट दिसते. जग दिसतं पण त्याच्याही पलीकडे जावून लेखिकेला स्वत:ला वाटलेलं भावविश्वातलं, विचारातलं जग लेखिकेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मी पाहिलेलं आभाळं, मी पाहिलेलं आंगण, मी अनुभवलेली ग्रामसंस्कृती, मला भावलेल्या व्यक्तिरेखा, मला भेटलेली प्रवासातील माणसं व त्यांचे स्वभाव विशेष, मी केलेला मनसोक्त प्रवास, माझ्या कल्पनेतील शाश्वत सत्य, मी पाहिलेली मंदिरे त्यांचे विशेष, मला आवडलेली लोकसाहित्याची अनेक रूपे, मला त्या अमुक एका गोष्टीमागे गवसलेले अपूर्व सत्य, मला असं वाटतं, मला हे आवडतं, मला असं म्हणावसं वाटतं, माझं मत असं आहे. अशी सर्व वर्णने लेखिकेच्या 'मी' चे अविष्करण करतात. लेखिकेच्या व्यक्तिमत्वाचा आरसा

म्हणजेच 'मी' ला लागू असणारे सर्व शब्द आहेत. त्यातून आपल्याला लेखिकेच्या व्यक्तित्वाची ओळख होते.

''कधी आम्ही मिळून शंकराचार्यांची स्तोत्रं म्हणायचो, कधी गंगा लहरी म्हणायचो, तर कधी आई–आत्यांच्या ओव्या ऐकत बसायचो.''[३८]

''आमच्या लहानपणीचा श्रावण आमच्या शेजारी दिवेलागणीच्या वेळी अगदी घरात येऊन बसायचा.''[३९]

**छान प्रतिमा**

''नदीपलीकडच्य वृद्धेश्वराच्या देवळाचं प्रतिबिंब त्यात अस्पष्ट हलत असायचं आणि त्याच्या कळसावरच्या दिव्याची थरथरती रेषा पाण्याच्या पोटात हेलकावत शिरलेली दिसायची.''[४०]

**मनाची स्थिती**

''त्या त्या वेळी मनात जाग्या व्हायच्या त्या आठवणी, सगळ्या माझ्या लहानपणाच्या, मुठेच्या पुराशी निगडीत असायच्या. पण विजयवाड्याजवळ आवेगानं समुद्राच्या ओढीनं झेपावणारी कृष्णा मी एका सरत्या पावसाळ्यात पाहिली आणि प्रेमाची एक अनिवार, अतिभव्य अशी ओढ मला एकदम जाणवली.''[४१]

''हे वाचलं आणि मला वाटलं आपल्या त्या जीवनाच्या गोडव्याची सांगड मृत्यूच्या तीव्र जहराशी घालायची तशी कशी? दिवाळी तर मंगलाचाच उत्सव आहे माझ्यासाठी.''[४२]

**लेखिकेचे प्रवासी बॅग बद्दलचे मत**

''मी इकडे परतले ना, तेव्हा माझी अवस्था मोठी कठीण झाली होती. इथून निघाले तेव्हा माझी काळजी वाटून माझ्याबरोबर घरच्यांनी दिलेल्या नाना वस्तू, कपडे आणि इतरांनी त्यांच्या तिकडच्या नातलगांसाठी दिलेल्या नाना वस्तू, कपडे आणि इतरांनी त्यांच्या तिकडच्या नातलगांसाठी दिलेल्या वस्तू, पदार्थ यांनी माझी बॅग गच्च भरली होती. परत येताना आठवणीसाठी दिलेल्या वस्तुंनी आणि कपड्यांनी ती पुन्हा ओसंडून गेलीच, पण त्याचबरोबर मनही भरून वाहू लागलं.''[४३]

**लेखिकेचे प्रवासाविषयीचे मत**

''वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून अनोळखी चेहऱ्यांबरोबर, अनोळख्या ठिकाणी भटकायची माझी उपजत आवड मी सिद्ध करत आलेली आहे, दारावर आलेल्या एका म्हाताऱ्या पेरूवाल्याबरोबर मी खुशाल त्याच्या सायकलवर बसून लांब चक्कर मारली, तेव्हा मी साडेतीन वर्षाची असेन. तेव्हा पासून आजवर माणसं, मुलूख पाहत हिंडण्याची संधी मी बहुधा दवडलेली नाही.''[४४]

बाल्याचं बलिदान या ललित लेखातील वयाच्या कोवळ्यापणातच देवत्वाचं भयंकर कवच घातलेल्या गोबऱ्या,एवढ्याशा पोरी विषयी लेखिका पोटातून कळवळून जाते. तिला स्वत:चं लहानपण आठवतं.

**आठवणींतले आंगण**

'आमच्या घरी मातीची चूल होती,' 'मी भराड्याचे गाणे ऐकले ते आणखीच उत्कटपणे भावले.' लोककथांमधून आणि लोकगीतांमधून भेटणारे शंकर- पार्वतीचे हे दैवी जोडपे मला नेहमीच फार आवडते. 'फेराची गाणी मला फार आवडतात. 'ज्या गोष्टी मी

ऐकल्या-वाचल्या, त्या खोट्या नव्हेतच, असे मला वाटते.' नाटक पाहताना लेखिका अलिप्त होत असे. भोवतीच्या प्रेक्षक समुहाचे भान ती विसरत असे, लेखिकेच्या लहानपणी तिला भातुकलीचा खेळ म्हणजे जीव की प्राण होता. रंगीबेरंगी कपड्यातली बाहुली व तिची सजीवता तिच्याशी खेळताना लेखिकेने अनुभवली होती. अगदी पहिल्या वेळी लेखिकेने ऐकलेल्या ओव्या व तेव्हाचा अनुभव आजही लेखिकेच्या मनात आहे. तो अगदी जिवंत, हलता, श्वास-टाकता असा आहे. या सर्व वाक्यातून आपल्याला लेखिकेच्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख पटते. ग्रामसंस्कृती व लोकसाहित्य यांचा अपार ओढा लेखिकेला आहे. ''लेखिकेचे लहानपण पुण्याच्या शनिवार पेठेत गेले. लहानसे भाड्याचे घर. वडील प्राचीन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अभ्यासक. घरात त्या विषयावरची शेकडो-हजारो पुस्तके आणि पोथ्या. त्यांच्या पसाऱ्यात वडिलांचे लेखन-वाचन चाले. आम्ही मुले त्यांच्या अवती-भोवती वावरत असू. घरात माणसांची अखंड वर्दळ. आल्या-गेल्या माणसांशी वडील बोलत असत ते अखंड आपल्याच अभ्यासाच्या विषया संबंधी. त्या चर्चा आणि गप्पा गोष्टी, मला कळत असोत-नसोत, मी खूप ऐकल्या.'' यावरून असे दिसून येते की, लेखिकेला बालपणीच पुस्तकांविषयी ओढ निर्माण झाली होती.

''अवघ्या २०-२२ वर्षांपूर्वी आम्ही दहा-बारा घरच्या मुली परकर खोचून आई-वहिन्यांच्या बरोबरीने भली थोरली दोन्ही आंगणे शेणाने सारवून काढत असू, प्रत्येक घराच्या दारापुढे मग हौसेने रेखलेली, रंग भरलेली रांगोळी.''

''आमच्या घरी माझ्या आठवणीत मातीची चूल होती. मधल्या घरात दोराची झोळी होती. जाते घालून आई-आत्या नियमाने दळण दळीत. ओव्या म्हणत.

''मोठे मोठे डोळे हरिण पाडसाचे।

तसे राजसीचे।

अरूणा बाईचे॥''

अशा आपले नाव गुंफून म्हटल्या जाणाऱ्या ओव्या ऐकताना फार सुख वाटे. त्या ओव्यांची गोडी तेव्हा लागली, ती अजून सरलेली नाही.''

''माझ्या अवतीभोवती वावरणाऱ्या स्त्रिया–आजी, वहिनी, काकू यांच्या तोंडी सहज म्हणी–वाक्प्रचारांचा सतत राबता असे. सुंदर फुलवाती करणाऱ्या, नाना तऱ्हेचे गव्हले, खिरी, शेवया करणाऱ्या या बायका सरसर विणकाम करणाऱ्या, कशिदाकारी करणाऱ्या या बायका.''

''नागपंचमीच्या आगेमागे महिनाभर घुमणारी फेराची गाणी, लग्नानंतर घातला जाणारा देवीचा गोंधळ, संक्रांतीला उतू जाणारे बोळक्यातले दूध, दिवाळी नंतर दाराबाहेर पुजले जाणारे शेणाचे पांडव, धडधडून पेटणारी सामुदायिक होळी, मी क्षीण स्वरूपात का होईना, पण हे सारे श्रद्धा–संस्कृतीचे वातावरण अनुभवत आले.''

लेखिका या सर्व सांस्कृतिक वातावरणाशी समरस झालेल्या होत्या. तेच त्यांनी 'आठवणींतले आंगण' व 'मनातलं आभाळ' या पुस्तकांतून मांडले आहे.

### ३.४ मुक्त चिंतन

''ज्ञात विश्वाचा विस्तार एका अनाकलनीय अशा धुसरतेकडे सरकत जातो व अशावेळी मनाच्या तळाशी दबली गेलेली सगळी अतर्क्यता, सगळी संदिग्धता आणि सगळा हळवेपणा उफाळून वर येतो. दिवसभर बेडरपणे उभे असतो आपण जगण्याला घट्ट सामोरे

होऊन पण संध्याकाळ होते आणि रणांगणावरून तात्पुरत्या विश्रांतीसाठी परतल्यासारखं आपलं मन सांजावत्या प्रहारासमोर उघडं करतं आपल्या जखमा.''[४५]

''माणसाच्या जन्म–मृत्यूला कवेत घेऊन तहान अखंडपणे अनादी अनंत आणि शतरूपिणी उरली.''[४६]

''सृष्टीचा आरंभच मुळी चैतन्याच्या विघटनातून झाला आहे. आदिपुरूषानं स्वत:चं शरीर विभागलं आणि स्त्री–पुरूषांची निर्मिती झाली. अंधार आणि पाणी यांच्या अर्थशून्य कल्लोळातून अर्थपूर्ण सृष्टी तयार झाली. मुळात जे होतं ते तुटलं, मोडलं, त्याचे तुकडे झाले, ते दुसऱ्या कशात तरी मिसळलं, संपलं आणि नवंच काही त्यातून जन्माला आलं. म्हणून मृत्यू जेथे आहे तेथे निर्मितीही आहे. पण वरवर पाहाता माणसाला भिती वाटते मृत्यूची. मोडतोंड, विघटन नको वाटतं. त्याला मरण शोककारी वाटतं. संस्कृतीनं वर्षातला एक सण असा दिला आहे की, या दिवशी तरी मृत्यूच्या पोटी दडलेल्या मंगल अर्थाची जाणीव माणसाला व्हावी. मृत्यूनं ग्रासलेल्या जीवनाच्या निर्माण क्षमतेवर त्यांनी विश्वास ठेवावा आणि निर्मितीचं मायपोट म्हणून मृत्यूचा गौरव करावा.''[४७]

''जे लढण्यानं मिळत नाही, ते झुकण्यानं मिळतं. जिंकण्याचा, आत्मगत करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे चरण स्पर्श! कित्येकदा शस्त्रांनी मिळत नाही, ते या स्पर्शानं मिळतं.''[४८]

एकदा मी लाकडाच्या खुट्यांना दोर बांधून त्यावर नाचणारी कठपुतळी पाहिली होती. इतकी सुरेख होती ती! पण दोर तुटले तेव्हा खाली पडून तिचा पार चक्काचूर झाला.

''आपलं शरीरही असच असतं. दिसतं खूप सुंदर! पण आयुष्याचे दोर तुटले की सगळं संपतं. मग असल्या शरीरातलं काय आवडणार आपल्याला ? तुम्ही कशाला या शरीराचा लोभ धरता ? भिंतीवरचं रंगीत चित्र पुसतं, तसं पुसून जातं हे शरीर. जादूगाराच्या जादूसारखं नाहीसं होतं. या उदाहरणातून जीवनाविषयीचे विचार अरूणा ढेरे यांनी स्पष्ट केलेले आहेत.''[४९]

'''स्त्रीतत्व' जीवनात हे स्त्रीतत्व विविध रूपांत प्रकटतं. कधी पुरूषाला प्रेरणा देणारी पत्नी होऊन, कधी त्याच्याबरोबर प्रणयाचा खेळ मांडणारी सहचारिणी होऊन, कधी वत्सल माता होऊन, तर कधी सर्जनाला बाध आणू पाहणाऱ्या गोष्टींचा संहार करण्यासाठी सिद्‌ध झालेली आदिशक्ती म्हणूनही.'' या विचारावरून आपल्याला स्त्रीचे महानत्व स्पष्ट होते. लेखिकेचे स्त्री शक्ती विषयी असणारे मत स्पष्ट होते.''[५०]

वेदनेची श्रेष्ठतम अवस्था म्हणजे चिरसुख. वेदनाच विश्वसत्याला स्पर्श करू शकते. सुखाची ही परिभाषा संतांची आहे. शुद्ध ज्ञानाची उपासना करणारे जसे थोडे असतात, तसे चिंतनाच्या वाटेवर चालणारे लोकही फार दुर्मिळ असतात. लेखिकेचा चिंतन, मनन करणे व ज्ञान मिळवणे हा विचार येथे दिसून येतो.

वरिलप्रमाणे लेखिकेचे मुक्त चिंतन कशा अस्थिर पातळीवर जावून पोहोचते याची प्रचिती येते. ज्ञात विश्व, सकाळ, संध्याकाळ, जन्म-मृत्यू, सृष्टीची निर्मिती-विनाश, लढणे-जिंकणे यातील आणि शस्त्र-स्पर्श यांतील श्रेष्ठत्व दर्शाविणारे विचार, कठपुतळी बाहुली व मानवी जीवन यांच्यातील साम्य, जादुगाराच्या जादूसारखं असणारं आपलं शरीर, विविध रूपांत प्रकटणारे स्त्रीतत्व, विश्वसत्याला स्पर्श करणारी वेदना, शुद्ध ज्ञानाची उपासना करणारे संत या सर्वांतून आपल्याला लेखिकेने केलेले मुक्तचिंतन उदात्त विचार यांविषयीची जाण

आपल्यात निर्माण होते. व ही वेगळी विचारदृष्टी वाचकाला देण्याचे कार्य अरूणा ढेरेंचे लेखन करते.

### ३.५ ''लोकसंस्कृती, लोकमानस ''

लोकसंस्कृती, परंपरा, रुढी, श्रद्धा ह्या मानवी मनाच्या खोलात घर करून बसलेल्या असतात. मानवी मनातील इच्छांचा व लोकरूढीतील घटनांचा एकमेकांशी मेळ बसतो व ह्या गोष्टी मनाला सुख देवून जातात. त्यामुळे माणसांचा त्या गोष्टींवर विश्वास बसतो व त्या गोष्टी माणसाच्या मनावर अधिराज्य करतात. लोकरूढी, लोककथा, पुराणकथा ह्या जनमानसात मान्यता पावतात.

### ३.५.१ कौटुंबिक लोकसंस्कृती :-

म्हणी, उखाणे, ओव्या, वाक्प्रचार लेखिकेच्या लहानपणी घरातील आजी, वहिनी, काकू यांच्या तोंडी म्हणी-वाक्प्रचारांचा सतत राबता असे.

''एकत्र कुटुंब, सासू-सासरे, त्यांच्या सुना, मुले-नातवंडे असा मोठा परिवार यांना त्या निमित्ताने वारंवार भेटतो. यात्रा, सण, उत्सव अधून-मधून चालू असतात.''[५१]

अठरा-वीस कुटुंबाच्या वाड्यात लेखिका वाढली. शेजारी शे-पन्नास कुटुंबाचा एक भला थोरला वाडा होता. ग्रामजीवनामध्ये असणारी मायेची ऊब घरी चालू असलेली सणांची रेलचेल, धार्मिक विधी, परंपरा, रोजच्या जीवनात मिळत असणारे आदर्श संस्कार, मूल्यांची जडण-घडण, लोकसाहित्याचा ठेवा जपणाऱ्या घटकांचा घरी असणारा वावर. यासर्व बाबींचा लेखिकेने लेखनात उपयोग केलेला आहे. अशाप्रकारे लेखिकेने कौटुंबिक लोकसंस्कृती जपलेली दिसून येते.

### ३.५.२ सामाजिक लोकसंस्कृती :-

पोवाडे, जागरण, विधी, नाट्य, गोंधळी, भुत्ये, कीर्तन, प्रवचन, बाहुल्या, गौरी गणपतीची गाणी, फेराची गाणी, पंचमीची गाणी, स्त्री-गीते, लोकगीते, भराडी, रामजन्म सोहळा, कृष्णजन्म सोहळा.

''माझी एक मैत्रीण रहायची त्या वाड्याच्या ओसरीवर, अष्टदशभुजा भवानीची सुंदर मुर्ती होती. त्या देवीचे गंभीर, सुबक रूपडे माझ्या डोळ्यांत अगदी भरून गेले होते. तिथे नवरात्रात सतत दिवा लागे. अष्टमीला बायकांचे घागरी फुंकणे बघायला बायका घोळक्याने जात.''

''कधी सहा रेघांचे चंद्रसूर्य, गाईची पावले रांगोळीने काढणे, कधी रोज निरांजनात फुलवात लावणे, कधी दिवे घासणे, कधी बेल वहाणे, तर कधी उपवास करणे अशाच तऱ्हेचे उपचार ही व्रते सांगतात. त्यांचे कडक नियम बनवले ते पुरोहित वर्गाने त्यातून स्वत:चे पोट भरण्याची त्यांनी सोय केली. आणि पुढे सर्वसामान्य स्त्रिया भावनेपेक्षाही या कर्मकांडाच्या काटेकोर पालनातच सार्थक मानू लागल्या.''[५२]

''शेतीची कामे, गुरा-वासरांचे चारापाणी व्यवस्थित चालू असते. अन्नसत्रे, सहस्त्र भोजनेही गावात चालू असतात. श्राद्धकर्मे घडतात. वेदाध्ययन चालू असते.''[५३]

### ३.५.३ भावनिक लोकसंस्कृती :-

नदी आणि समुद्र यांचे नाते. प्रियकर-प्रेयसीचे मानवी मनाचा भावनिकतेशी खूप जवळचा संबंध आहे. संवेदना व भावना यांची जोडच आपल्याला समाजाशी एकरूप होण्यास मदत करते. भावनिक मन ग्रामजीवनातील प्रेयसी ही या भावनेच्या ओढीतूनच नदीच्या पलीकडे असणाऱ्या प्रियकराला भेटण्यासाठी तेवढ्या ओढीने नदी पार करून जाते.

असा उल्लेख लेखिकेने केलेला आहे. एकत्र कुटुंबपद्धती मधील नाती ही भावनेच्या आधारानेच जोडलेली आपणांस दिसून येतात. राधा आणि कृष्णाच्या प्रेमाचे वर्णन राधेच्या भावनिक जोडण्यातून झालेले आहे पण तो विचार शाश्वत सत्याकडे घेऊन जातो. अशाप्रकारे भावनिक लोकसंस्कृती जपण्याचे कार्य या लेखनाने केलेले आहे.

**३.५.४ काल्पनिक लोकसंस्कृती / लोकमानस :–**

''निमाडी भाषेतल्या शिळासप्तमीच्या कथेत मेलेले मूल पुन्हा जिवंत होणे ही आपल्याकडच्या त्या कहाणीतलीच कल्पना आहे. पण त्याच बरोबर शिळे अन्नच खावे, असा नियम असताना ताजे अन्न खाऊ घालण्याच्या 'पापामुळे मूल मेले' अशा गोष्टीतून 'शिळासप्तमी' नावाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो.''[५४]

''देवाने येऊन मनुष्याची कसोटी पहावी आणि मनुष्याने त्या कसोटीला उतरावे आणि उत्तम फळ भोगावे किंवा मग कसोटीला उतरू नये व वाईट फळ भोगावे. असा लोक मानस ग्रामजीवनात आढळतो. ''[५५]

घरी संध्याकाळच्या वेळी मरणाचे अपशब्द उच्चारायला बंदीच असते. पुराणकथा, कहाण्या, दंतकथा या सर्व पूर्वीच्या लोकांनी जतन केलेला लोकसाहित्याचा व लोकमानसचा भाग आहे. लोकांच्या दैवावर असणाऱ्या श्रद्धा या पुराणकथा, कहाण्या यांच्यामधून व्यक्त होत असताना लेखिकेने आपल्या लेखनात टिपलेल्या आहेत.

**३.५.५ भविष्यकालीन लोकमानस :–**

भविष्यात हा लोकसंस्कृतीचा ठेवा जतन करून ठेवला पाहिजे असे लेखिकेला वाटते. पूर्वीची संस्कृती ही भारताची शान राखणारी होती. आज काल पाश्चात्यांच्या अनुकरणामुळे संस्कृती लोप पावत चालली आहे. अशा मुळे लेखिकेला वाटते

की ही आपल्या संस्कृतीची नाळ आजही लोकांशी, समाजांशी जोडलेली असावी त्यामुळे आपल्या भविष्याला धोका पोहोचणार नाही. 'जुनं ते सोनं' या न्यायाने आपल्याला आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी व भविष्यकालीन संस्कृतीसाठी लोकमानस जपलेले दिसून येतात.

वर्तमानकालीन घटना व भूतकालीन घटना यांचा एकमेंकाशी मेळ घालून त्यावरच भविष्यकाळ अवलंबून असतो. असे करण्याचा प्रयत्न व त्यातूनच भूतकाळातील वर्तमानकाळाशी असणारे साम्य व भेद स्पष्ट केले आहेत. काही प्रसंगी साधर्म्य आढळते तर काही प्रसंगी भूतकाळाची व वर्तमानाकाळातील परिस्थितीमध्ये तफावत आढळते. ते लोकसंस्कृती मधील प्रसंगांची उदाहरणे देऊन हा विरोधाभास लेखिकेने दाखवलेला आहे.

लोकसंस्कृतीचा ठेवा असणाऱ्या ओव्या, कथागीते, लोकगीते, दैवतगीते, राधाकृष्णाची गीते, घरगुती ओव्या, कविता, श्लोक, लावणी, पोवाडा, दशावतार आणि किर्तनविषयीचे खोलवर व सूक्ष्म विचार अरूणा ढेरे यांच्या लेखनातून स्पष्ट होताना आपल्याला दिसून येतात. लोकसाहित्याच्या ह्या घडकांचे संरक्षण व संवर्धन होणे आजच्या काळात खूपच गरजेचे आहे व ते अरूणा ढेरे यांच्या लेखनाने जपले आहे.

ग्रामसंस्कृतीमधील मन हे खूपच संवेदनशील व भावनिक असतं हे लेखनातून आपल्याला जाणवतं. लेखिकेच्या आजीने तिला बाहुली व भातुकलीचा खेळ याविषयी बोललेले विचार लेखिकेच्या मनाने भूतकाळात मारलेली दडी यावरून हे आपल्या लक्षात येते. अशाप्रकारे अरूणा ढेरे यांच्या लेखनाने सहज, सोप्या व शाश्वताचा विचार, चिंतनाचा विचार हृदयाला स्पर्श करून जाईल असे करून सोडले आहे. वाचकाला स्वत:चा न ठेवता त्या लेखनाचाच करून टाकले आहे. वाचक वाचतावाचता त्या लेखनात रमतो, विचार करू लागतो

व सहजच त्याला जीवनाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी मिळून जाते, अशा पद्धतीचे हे लेखन आहे.

**३.६ '' चित्रण–स्वरूप विविधता'':–**

'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' यांचं स्वरूप जरी सारख असलं तरी विचारांची व्यापकता आढळते. पण; ही व्यापकता व्यक्तिगत स्वरूपाची आहे. ललित साहित्याच्या निर्मात्यांजवळ लोकमनावर राज्य करण्याची आणि लोकमनांची घडण करण्याचीही एक वेगळी ताकद असते. आपल्या निर्मितीद्वारा वाङ्मयीन परंपरेला लेखक नवं वळण देऊ शकतो. याची प्रचिती आपल्याला अरूणा ढेरेंचे लिखाण पाहिल्यावर येते.

'मनातलं आभाळ' या ललित लेखसंग्रहामध्ये लेखिकेने बालकवी, खानोलकर, बाळ कोल्हटकर, बोरकर, कुसुमाग्रज, साधु दास, कवी ग्रेस,म.म. देशपांडे, गाथासप्तशती, भा.रा. तांबे, संत रामदासस्वामी या महान व्यक्तिमत्वांच्या तोंडातील पद्य चरणपंक्ती, श्लोक यांचा उपयोग लेखिकेने आपल्या लेखनात अतिशय योग्य पद्धतीने केला आहे. हिंदी भाषेतील काव्यपंक्ति , मराठीतील कविता, कबिरांचे दोहे, अक्कमहादेवींची वचने,संत रामदासांचे श्लोक या विविधांगी स्वरूपाने लेखिकेच्या ललित लेखांनी एक उत्कृष्ट प्रकारचा शृंगार केला आहे असे वाटते. ग्रामसंस्कृती, लोकसाहित्य प्रकारचा शृंगार केला आहे असे वाटते. ग्रामसंस्कृती, लोकसाहित्य यांना मानवी मनाशी जोडण्याचे कार्य लेखिकेने केले आहे. लेखिकेने पाहिलेला निसर्ग, तिला भेटलेली माणसे त्यांचे स्वभाव तसेच लेखिकेने केलेला प्रवास यांचे हुबेहुब वर्णन करण्याचे सामर्थ्य लेखिकेच्या लेखनात असल्याचे आपणांस दिसून येते.

लोकसाहित्याचा ठेवा जतन करणाऱ्या 'आठवणींतले आंगण' या पुस्तकामध्ये ओव्या, वाक्प्रचार, लावण्या, लोकगीते, लोककथागीते, पुराणकथा, दंतकथा, दशावतार विधी–नाट्य, जागरण आणि या सर्वांबरोबरच किर्तनाचा सोनेरी साज त्यांच्या लेखनाने परिधान केलेला आहे.

लेखिका कधी आपल्याला सहजपणे आपल्या साध्या सोप्या भाषेतून बालपणात रमविते व त्यातच जीवनाविषयी उदात्त विचार मांडून आपल्याला जगण्याचे भान आणून देते. तर कधी शाश्वत–अशाश्वत याविषयी मुक्तचिंतन करता करता ते मानवी जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न लेखिका करते. अरूणा ढेरे यांचे लेखन हे विविधरंगी, विविधअंगी अशा विविध परंपरांनी व घटकांनी सामावलेले, परिपूर्णरित्या भरलेले असे लेखन आहे. निसर्गाचे वर्णन, मानवी जीवनाचा आलेख, लोकसाहित्य, ग्रामसंस्कृती, मुक्तचिंतन असे अनेक घटक त्यांच्या लिखाणाचा भाग बनलेले आहेत.

जागरण, विधी–नाट्य, बाहुल्याचा खेळ, पिंगुळा, दशावतार या सर्व लोकसाहित्याच्या ठेव्याची ओळख त्यांनी व्याख्या–अर्थ–स्वरूप वर्णन या पद्धतीने करून दिली आहे. त्यामुळे लोकसाहित्यातील या घटकांविषयी लेखिकेने अधिक माहिती दिली आहे. व लोकसाहित्याचे संरक्षण व संस्कृतीचे संवर्धन करण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

अशाप्रकारे अरूणा ढेरे यांच्या लेखनात व चित्रणस्वरूपामध्ये विविधता आलेली आपणांस पहावयास मिळते.

१. सारांश

'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललित लेखसंग्रहांमध्ये बालविश्व, श्रद्‌धा, संस्कृती, परंपरा, लोकसाहित्य, निसर्ग, धार्मिकता, काल आणि आज, शाश्वत–अशाश्वत, 'मी' च्या भोवतीचे जग, लोकसंस्कृती, लोकमानस या सर्व घटकांच्या आधारे लेखिकेने आपल्याला आजूबाजूच्या भागांमधून फेरफटका मारून आल्याचे समाधान दिले आहे. जे भावलं, जे दिसलं, जे वाटलं, जे आहे त्या सर्वांचा फोटो काढण्याचे काम लेखिकेने केलेले आहे.

हे ललितलेखसंग्रह वाचणे म्हणजे फोटो बघणे होय. तेही स्वत: भोवतीच्या जगाचे, **'मनातल्या सुप्त विचारांचे – मनातलं आभाळ'** अबोधावस्थेतील स्वप्नांचे, **'नकळत मनात येऊन जाणारे आठवणींतले आंगण...!'** आपल्याला अनुभवावयास मिळते.

२. समारोप

या प्रकरणात आपण 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या लेखसंग्रहातील चित्रणविविधता अभ्यासली. बालविश्वाचे चित्रण, श्रद्‌धासंस्कृती; परंपरा यांचे चित्रण, लोकसाहित्याचा अनमोल ठेवा जतन करणोर चित्रण, निसर्ग चित्रण, धार्मिकता दर्शविणारे चित्रण, निसर्गाकडून दैववादाकडे झुकलेले चित्रण, काल आणि आज फरक दर्शविणारे चित्रण, शाश्वत आणि अशाश्वत दर्शन घडविणारे चित्रण या सर्व गोष्टींचा अभ्यास केला. तसेच लेखिकेच्या लहानपणीच्या आठवणी, अनुभव, घटना, प्रसंग व लेखिकेची मते 'मी' चा अविष्कार या घटकात पाहिला.

मुक्तचिंतनमध्ये लेखिकेच्या लेखनातून केले गेलेले मुक्तचिंतन आपण अनुभवले. याप्रमाणेच आपण लोकसंस्कृती व लोकमानस या भागात कौटुंबिक लोकसंस्कृती, सामाजिक लोकसंस्कृती, भावनिक लोकसंस्कृती, काल्पनिक लोकसंस्कृती व शेवटी भविष्यकालीन लोकमानस यांचा अभ्यास केला.

पुढील प्रकरणात आपण अरूणा ढेरे यांच्या ललित लेखनाच्या भाषाशैलीचा अभ्यास करूया.

***

# संदर्भ सुची


१) ढेरे अरूणा : 'मनातलं आभाळ' मंजुल प्रकाशन
ऑगस्ट १९९४.
द्वितीयावृत्ती
पृ.७,८

२) तत्रैव : पृ.८,९

३) तत्रैव : पृ.१०

४) ढेरे अरूणा : 'आठवणींतले आंगण'
पद्‌मगंधा प्रकाशन,
ऑगस्ट १९९९.
पृ.३८

५) तत्रैव : पृ.५९

६) तत्रैव : पृ.१११, ११२

७) ढेरे अरूणा : 'मनातलं आभाळ'
मंजुल प्रकाशन, ऑगस्ट १९९४.
द्वितीयावृत्ती
पृ.३७

८) तत्रैव : पृ.५५

९) तत्रैव : पृ.१४३

१०) तत्रैव : पृ.१४८

११) तत्रैव : पृ.१५६

१२) ढेरे अरूणा : 'आठवणींतले आंगण'
पद्‌मगंधा प्रकाशन,
ऑगस्ट १९९९.
पृ.४९

१३) तत्रैव : पृ.९९

१४) ढेरे अरूणा : 'मनातलं आभाळ'
मंजुल प्रकाशन, ऑगस्ट १९९४.
द्वितीयावृत्ती
पृ.४२

| | | | |
|---|---|---|---|
| १५) | तत्रैव | : | पृ.५९ |
| १६) | तत्रैव | : | पृ.६१,६२ |
| १७) | तत्रैव | : | पृ.८१ |
| १८) | तत्रैव | : | पृ.८३ |
| १९) | ढेरे अरूणा | : | 'आठवणींतले आंगण'<br>पद्मगंधा प्रकाशन,<br>ऑगस्ट १९९९.<br>पृ.१३१ |
| २०) | ढेरे अरूणा | : | 'मनातलं आभाळ'<br>मंजुल प्रकाशन, ऑगस्ट १९९४.<br>द्वितीयावृत्ती<br>पृ.३८ |
| २१) | तत्रैव | : | पृ.४० |
| २२) | तत्रैव | : | पृ.६२ |
| २३) | तत्रैव | : | पृ.१०४ |
| २४) | तत्रैव | : | पृ.१३३ |
| २५) | ढेरे अरूणा | : | 'आठवणींतले आंगण'<br>पद्मगंधा प्रकाशन,<br>ऑगस्ट १९९९.<br>पृ.१७ |
| २६ | तत्रैव | : | पृ.३३ |
| २७ | तत्रैव | : | पृ.८३ |
| २८ | तत्रैव | : | पृ.८४ |
| २९ | तत्रैव | : | पृ.१०४ |
| ३० | तत्रैव | : | पृ.१०५ |
| ३१ | तत्रैव | : | पृ.१६७ |
| ३२ | ढेरे अरूणा | : | 'मनातलं आभाळ'<br>मंजुल प्रकाशन, ऑगस्ट १९९४.<br>द्वितीयावृत्ती<br>पृ.२७ |

३३ तत्रैव : पृ.४७

३४ तत्रैव : पृ.५४

३५ तत्रैव : पृ.७१

३६ तत्रैव : पृ.३१

३७ तत्रैव : पृ.८२

३८ तत्रैव : पृ.३९

३९ तत्रैव : पृ.३८

४० तत्रैव : पृ.४१

४१ तत्रैव : पृ.४२

४२ तत्रैव : पृ.५३

४३ तत्रैव : पृ.११७

४४ तत्रैव : पृ.१२०

४५ तत्रैव : पृ.२२

४६ तत्रैव : पृ.२५

४७ तत्रैव : पृ.५४

४८ तत्रैव : पृ.६०

४९ तत्रैव : पृ.८०

५० तत्रैव : पृ.८४

५१ तत्रैव : पृ.२२

५२ तत्रैव : पृ.२१

५३ ढेरे अरूणा : 'आठवणींतले आंगण'
पद्मगंधा प्रकाशन,
ऑगस्ट १९९९.
पृ.२२

५४ तत्रैव : पृ.२१

५५ तत्रैव : पृ.५८